क्र.महानिर्मिती/मासं-सेप्र/ [illegible]-2504 दिनांक : 24 FEB 2021

**विषय** : जाहिरात क्र.०४/२०१९ अनुसार तंत्रज्ञ-३ या पदाकरिता एस.ई.बी.सी. प्रवर्गात निवड झालेल्या उमेदवारांना ई.डब्ल्यू.एस. प्रवर्गामधून निवडीसाठी विकल्प देण्याबाबत.

**संदर्भ** : महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०१९.

---

१. महानिर्मिती जाहिरात क्र.०४/२०१९ अन्वये तंत्रज्ञ-३ पदे सरळसेवेद्वारे भरण्याकरिता सन २०१९ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानंतर स्पर्धा परिक्षा घेऊन माहे फेब्रुवारी- २०२० मध्ये उमेदवारांचे प्राप्त गुण जाहीर करण्यात आले व कागदपत्र पडताळणीनंतर निवड झालेल्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे पात्रता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. त्यानंतर सदर पात्र उमेदवारांपैकी न्यायालयीन प्रकरणामुळे एस.ई.बी.सी. व ई.डब्ल्यू.एस. या प्रवर्गातील उमेदवार वगळून, उर्वरित उमेदवारांच्या नियुक्तीचे आदेश माहे जानेवारी-२०२१ मध्ये निर्गमित करण्यात आले आहेत.

२. दरम्यान शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि.२३.१२.२०२० तसेच महाराष्ट्र शासन, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र.२५/ऊर्जा-२ दि. १०.०२.२०२१ व क्र.संकीर्ण-२०२१/ प्र.क्र.६५/ऊर्जा-२ दि. १८.०२.२०२१ अन्वये, सन २०१९ या वर्षात महानिर्मिती कंपनीने प्रसिध्द केलेल्या उपरोक्त तंत्रज्ञ-३ पदाच्या जाहिरातीद्वारे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास (एस.ई.बी.सी.) प्रवर्गातील उमेदवारांकडून सरळसेवा भरतीकरीता आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचे (ई.डब्ल्यु.एस.) प्रमाणपत्र घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

३. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास (एस.ई.बी.सी.) प्रवर्गातून उपरोक्त पदांकरीता निवड झालेल्या उमेदवारांना, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि.२३.१२.२०२० मधील तरतुदी लागू राहतील. त्यानुसार एस.ई.बी.सी. प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या अथवा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचे (ई.डब्ल्यु.एस.) लाभ घेणे ऐच्छिक राहील. ज्या उमेदवारांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचे (ई.डब्ल्यु.एस.) लाभ घ्यावयाचे आहेत, अशा उमेदवारांनी मा.सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचे (ई.डब्ल्यु.एस.) प्रमाणपत्र प्राप्त करुन त्यांच्या इच्छेनुसार उपरोक्त निवड प्रक्रियेत सहभागी होता येईल.

४. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास (एस.ई.बी.सी.) प्रवर्गातून उपरोक्त पदांकरीता निवड झालेल्या तथापि, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठीचा (ई.डब्ल्यु.एस.) लाभ न घेऊ इच्छिणारे उमेदवार, खुल्या प्रवर्गासाठी असलेल्या जाहिरातीमधील अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास, सदरील उमेदवारांचे अर्ज खुल्या प्रवर्गातून विचारात घेण्यात येतील.

५. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचे (ई.डब्ल्यु.एस.) लाभ घेऊ इच्छिणाऱ्या सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास (एस.ई.बी.सी.) प्रवर्गातील उमेदवारांना याबाबतचे प्रमाणपत्र विहित सक्षम प्राधिकरणाकडून प्राप्त करुन आपल्या श्रेणीमध्ये (सामान्य/प्रगतकुशल/बी.टी.आर.आय.) व तसेच आपल्या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गामध्येच अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

६. वरीलप्रमाणे एस.ई.बी.सी. प्रवर्गातील उमेदवारांना "खुल्या" अथवा "ई.डब्ल्यु.एस." यापैकी कोणत्या आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा आहे, याबाबत स्विकारावयाच्या विकल्पाबाबत URL- लिंक व आवश्यक सूचना कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. त्याकरिता ३० दिवसांची मुदत देण्यात येईल, त्या मुदतीत संबंधित उमेदवारांनी प्रमाणपत्रासहीत विकल्प सादर करावयाचा आहे. विकल्प प्राप्त झाल्यानंतर दोन्ही प्रवर्गातील उमेदवारांची मूळ जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या ई.डब्ल्यू.एस. व खुल्या प्रवर्गाच्या पदांच्या मर्यादेत राहून गुणानुक्रमे सुधारित निवड यादी कंपनीच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यात येईल. तरी उमेदवारांनी कंपनीच्या (www.mahagenco.in) या अधिकृत संकेतस्थळाचे अवलोकन करावे.

७. त्यानंतर जाहिरात क्र.०४/२०१९ अन्वये खुल्या प्रवर्गातून भरती प्रक्रियेत समाविष्ट होऊ शकणाऱ्या सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास (एस.ई.बी.सी.) प्रवर्गातील उमेदवारांना, खुल्या प्रवर्गासाठी असलेल्या परीक्षा शुल्कानुसार आवश्यक फरकाची रक्कम / फी शुल्क भरावे लागेल व त्यानंतर नियुक्तीची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

८. उपरोक्त निवड प्रक्रिया हया मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ तसेच मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल झालेली रिट याचिका क्र.(स्टॅम्प) ९८३००/२०२०, मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र.९०८२/२०२०, ३३१/२०२१, ३९६/२०२१ व विविध न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या संलग्न / इतर याचिकांच्या अंतरिम / अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील.

**(भि.य.मंता)**
**कार्यकारी संचालक (मासं)**